


RNI NO-MAHMAR/2022/90217

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ
Email- jansanchlan@gmail.com
Mob- 9822720784




वर्ष ३ रे अंक : २३३ वा सोमवार दि १० नोव्हेंबर २०२५ पृष्ठ ८ किंमत ३ रुपये

# बोगस दिव्यांग कर्मचाऱ्यांवर कारवाईबाबत राज्यभरात बोंब?

## अकोला असो की बुलढाणा कुठेही कारवाई नाहीच...

**जनसंचलन/बुलढाणा**

दिव्यांगत्वाचे बोगस प्रमाणपत्र प्राप्त करून नोकरीतील लाभ उपटण्याचे प्रकार सध्या राज्यभरात सुरू आहेत. राज्य शासनानेही बोगस दिव्यांगांवर कठोर फौजदारी कारवाई करण्याचे निर्देश दिलेले आहेत, परंतु शासनाच्या आदेशाला हरताळ फासल्या जात असल्याचे दिसून येत आहे. बुलढाण्याप्रमाणे अकोल्यातही अनेक बोगस दिव्यांग कर्मचारी शासकीय सेवेचे लाभ उपटत असल्याचा प्रकार समोर आला. मात्र, कारवाईबाबत सगळीकडेच बोंब असल्याचे दिसून येत आहे. बुलढाण्यात बोगस दिव्यांग शिक्षक व कर्मचाऱ्यांचा आकडा हा ५०० हून अधिक असण्याची खात्रिलायक माहिती दैनिक जनसंचलनला व सिटी न्यूजला प्राप्त झालेली आहे. दिव्यांग नागरिकांचे कल्याण व्हावे व त्यांच्या उत्थानासाठी शासनाच्या वतीने विविध प्रकारचे लाभ हे दिव्यांग लोकांना दिले जातात. परंतु काही समाजकंटक याचा लाभ घेण्यासाठी जिल्हा रुग्णालयात असलेल्या दिव्यांग बोर्डाच्या अधिकाऱ्यांना चिरीमिरी देऊन धडधाकट लोकं दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र प्राप्त करीत आहेत. या प्रमाणपत्राच्या भरोश्यावर पदोन्नती, बदली यांचे लाभ हे कर्मचारी घेत आहेत. यासंदर्भात काही सामाजिक कार्यकर्ते व दैनिक जनसंचलन व सिटी न्यूजने आवाज बुलंद केल्यानंतर काही महिन्यांपूर्वी जिल्हा परिषदेचे तत्कालीन शिक्षणाधिकारी खरात यांनी आदेश दिले होते. दिव्यांग प्रमाणपत्र असलेल्यानी जेजे हॉस्पिटल मुंबई येथे जाऊन तपासणी करण्याचे निर्देशही देण्यात आले होते. परंतु या आदेशामुळे बोगस दिव्यांग कर्मचाऱ्यांमध्ये मोठी खळबळ उडाली. कारण अशा बोगस कर्मचाऱ्यांची संख्या प्रचंड असल्यामुळे त्यासाठी पद्धतशीरपणे लॉबिंग करण्यात आले आणि शिक्षणाधिकाऱ्यांच्या या आदेशावर आजवर अंमलबजावणी झालीच नाही.मुंबईत काही दिवसांपूर्वी बोगस दिव्यांग प्रमाणपत्र प्राप्त केलेल्या दोन कर्मचाऱ्यांना नुकतेच बडतर्फ करण्यात आले होते, त्यामुळे बुलढाण्यात अशीच कारवाई होण्याची अपेक्षा होती. बुलढाण्यासारखीच स्थिती अकोल्यातही दिसून येत आहे. कारण अकोल्यातही बऱ्याच शिक्षक व कर्मचाऱ्यांनी बोगस दिव्यांग प्रमाणपत्र प्राप्त करून दिव्यांगत्वाचे लाभ उपटत आहेत. तेथेही कारवाईच्या नावाने अजूनही बोंब आहे. बुलढाण्यात तर या बोगस दिव्यांगांवर कारवाई होईल की नाही, अशी भलीमोठी शंका उपस्थित केली जात आहे. सध्याच्या घडीला राज्यातील नोकरशाही एव्हढी मुजोर आणि गेंड्याच्या कातडीची झाली आहे की, राज्य शासनाने दिलेल्या आदेशांचेही ती पालन करीत नसल्याचे दिसून येत आहे. कारण शासनाने आदेश दिल्यानंतरही आजपर्यंत बुलढाणा जिल्ह्यात एकाही बोगस दिव्यांगावर कारवाई झालेली नाही. या नालायक बोगस दिव्यांग शिक्षक व कर्मचाऱ्यांमुळे जे खरे दिव्यांग आहेत, त्यांच्यावर मोठा अन्याय होत आहे. परंतु ही सर्व प्रक्रिया होताना मोठी आर्थिक उलाढाल झालेली असण्याची आणि यात अधिकाऱ्यांचेही खिसे गरम झालेले असण्याची शक्यता असल्याने कोणावरही कारवाई होताना सध्यातरी दिसून येत नाही. आता या प्रकरणी खुद्द राज्य शासनालाच पुढाकार घेऊन कारवाई करावी लागणार आहे. अशी कारवाई शासनाने केली तर ठीक अन्यथा शासनाचे आदेश देखील किती पोकळ आहेत हे सिद्ध होते.

अजून बरेच काही पुढील भागात...

**जिल्हा सामान्य रुग्णालयातून दिलेले बोगस दिव्यांग/अस्तित्वंग प्रमाणपत्र संबंधित कर्मचाऱ्यांची पूर्व परिस्थिती व आजची परिस्थितीची उच्चस्तरीय चौकशी करून त्या दोषींवर फोजदारी गुन्हे दाखल करण्याची मागणी होत आहे**







# सूज्ञ बुलढाणेकर मतदारांनी आता नव्या चेहऱ्यांना संधी देणे गरजेचे....

## चार वर्षांनंतर शहरातील लोकप्रतिनिधी निवडण्याच्या सुसंधीचा योग्य वापर करा

**जनसंचलन/बुलढाणा**

गेल्या चार वर्षांपासून प्रलंबित असलेल्या नगरपालिका निवडणुकांचा अखेर बिगुल वाजला. गेल्या चार वर्षांपासून नगरसेवकांअभावी कामकाज चालणाऱ्या नगरपालिकेला अखेर या माध्यमातून तिचे खरे वारसदार लोकप्रतिनिधी प्राप्त होणार आहेत. चार वर्षांनंतर आपले लोकप्रतिनिधी निवडण्याची संधी प्राप्त झाल्यामुळे आता सूज्ञ बुलढाणेकर मतदारांनीही या संधीचा लाभ घेऊन त्याच-त्याच चेहऱ्यांना निवडण्यापेक्षा नवीन, कर्तव्यदक्ष, हुशार व जनतेच्या प्रश्नांची चाड असणाऱ्या उमेदवारांना निवडणे गरजेचे आहे. एकेकाळी अत्यंत सुंदर, नयनरम्य आणि थंड हवेचे ठिकाण म्हणून प्रसिद्ध असलेल्या छोट्याशा बुलढाणा शहराचे गेल्या काही वर्षांमध्ये एकप्रकारे मोठ्या शहरात रुपांतरण झालेले आहे. शहर व परिसरात मोठ्या प्रमाणात वस्त्यांची वाढ झाली. लोकसंख्यादेखील मोठ्या प्रमाणात वाढली आहे. वॉर्डांची रचना बदलली आणि संख्येतदेखील वाढ झालेली आहे. गेल्या चार वर्षांपासून लोकप्रतिनिधींविना केवळ प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या भरोश्यावर नगरपालिकेचा कारभार हाकला जात होता, त्यामुळे या राज्यकारभारात कुठेतरी जनतेचा आवाज दबल्यासारखाच होता. अधिकाऱ्यांना वाट्टेल त्या पद्धतीने कामकाज हाकले जात होते. विशेष म्हणजे मागील कार्यकाळात बरेच अकार्यक्षम लोकप्रतिनिधीदेखील नगरपालिकेत पोहोचले. त्यामुळे मागील पाच वर्षे आणि त्यानंतरची ही चार वर्षे अनेक बाबतीत शहरात पाहिजे त्या प्रमाणात विकास झाला नाही. आमदार निधी, खासदार निधी या माध्यमातून नाही म्हणायला बरीच कामे झाली देखील. त्यातून बुलढाणा शहराचा काही प्रमाणात कायापालट झाला. परंतु एकीकडे हा विकास होत असताना दुसरीकडे कचरा व घाणीची समस्या काही केल्या दुरुस्त होताना दिसून येत नाही.काही वर्षांपूर्वी बुलढाणा अर्बनच्या वतीने शहरात स्वच्छतेचे कंत्राट घेण्यात आले होते, त्या वेळी शहरात कचरा व घाणीची समस्या अजिबात नव्हती. तत्परतेने शहरातील कचऱ्याचे नियोजन करण्यात येत होते. शिवाय दुसरीकडे शहरात वृक्षलागवड आणि सुशोभीकरणाची कामेदेखील होत होती. परंतु गेल्या काही काळात कचऱ्याच्या समस्येने शहराला पुरते ग्रासल्याचे दिसून आलेले आहे. शहरात गेल्या काही काळात वाहनांची संख्या प्रचंड वाढली आहे. त्यामुळे वाहनांचे शिस्तीत चालणे असो किंवा पार्किंग असो या विषयावर देखील मोठे काम करण्याची आवश्यकता आहे




.उर्वरित पान २ वर

# नागरी संस्था आणि राष्ट्र

## संपादकीय लेख

ङ्गसिव्हिल सोसायटीफ ( नागरी समाज संस्था ) या खऱ्या अर्थाने कोणत्याही देशाचा अविभाज्य भाग असतात. अशा नागरी समाज संस्थांनी सरकारसाठी एक जागरूक पालक म्हणून काम करणे आवश्यक असते. ते देशहिताचे असते. अशा संस्थानी प्रामुख्याने आरोग्य, शिक्षण, स्वच्छता, पोषण इत्यादी क्षेत्रांमध्ये वंचित लोकांच्या उत्थानासाठी कार्य करणे आवश्यक आहे. ती त्यांच्यावरील जबाबदारीच आहे. तथापि, सर्व नागरी समाज संस्था घोषित उद्दिष्टांच्या दिशेने कार्य करीत नाहीत; त्याऐवजी समाजसेवेच्या नावाखाली त्या राष्ट्राचे स्थैर्य आणि सुरक्षितता या बाबींना हानिकारक कार्य किंवा अशा कार्यांना प्रोत्साहित करण्याचे काम करतात, असे दिसते. आज जगातील अनेक देश हे नागरी समाज संस्थांच्या गैर कार्याच्या समस्येने त्रस्त आहेत. नागरी समाज संस्थांकडून अनेक विध्वंसक कारवायांना त्यांना सामोरे जावे लागत आहे. या अशा गोष्टींना भारतही अपवाद नाही. त्यामुळे नागरी समाज संस्था म्हणजे काय आणि त्याचे फायदे-तोटे काय आहेत, ते समजून घेणे गरजेचे आहे. नागरी समाज संस्थांच्या आदर्श कार्यांमध्ये सेवा तरतूद, जनउत्थान, धोरणात्मक वकिली आणि विकास, उत्तरदायित्व आणि पारदर्शकता सुनिश्चित करणे, जनजागृती करणे, मानवी हक्कांचे संरक्षण, सामाजिक संघर्ष निराकरण, निवडणुकांवर देखरेख ठेवणे इत्यादी महत्त्वपूर्ण पैलूंचा समावेश असतो. या सगळ्या गोष्टी करीत असताना नागरी समाज संस्थानी राष्ट्राच्या सर्वांगीण विकासास मदत करण्यासाठी एक नियमाधारित संस्था म्हणून कार्य करणे अपेक्षित आहे. परंतु बहुसंख्य खरोखरच तसे कार्य करतात का, हा प्रश्न पडतो व म्हणूनच त्या काय करतात हे खोलात जाऊन तपासणे गरजेचे आहे. जगभरातील नागरी समाज संस्था या नियम आणि कायदे यांच्या संचाद्वारे चालविल्या जातात. भारतानेही नागरी समाज संस्था आणि स्वयंसेवी संस्था (एनजीओ) यांचे नियमन करण्यासाठी कायदेशीर चौकट निश्चित केली आहे. त्या नियमांनुसार, अशा संस्थांची नोंदणी ऐच्छिक आहे. परंतु भारतात शाखा स्थापन करणाऱ्या कोणत्याही परदेशी संस्थेसाठी किंवा भारत किंवा परदेशातील फाउंडेशन, सरकार किंवा कंपनीकडून अनुदान घेणाऱ्या कोणत्याही संस्थेसाठी नोंदणी अनिवार्य आहे. एफसीआरए (विदेशी चलन नियमन कायदा) अंतर्गत नोंदणीकृत कोणत्याही नागरी समाज संस्था किंवा अशासकीय संस्था यांची नोंदणी काही विशिष्ट अटींच्या अधीन राहून रद्द करण्याचा अधिकार भारत सरकारला आहे. भारतात अनेक नागरी समाज संस्था आज कार्यरत आहेत. आणि या संस्थांमधील काही संस्था या खरोखर उत्कृष्ट कार्य करीत आहेत. त्यात युनायटेड नेशन्स एजन्सीज, सेंटर फॉर सिव्हिल सोसायटी, नॅशनल एनजीओ आदी संस्थांचा समावेश आहे. त्याचवेळी काही संस्था विहित नियमांचे सर्रास उल्लंघन करताना आढळतात. अशा काही प्रमुख संस्थांमध्ये ऑक्सफॅमच्या शैक्षणिक व इतर स्वयंसेवी संस्था, ॲम्नेस्टी इंटरनॅशनल सेंटर फॉर पॉलिसी रिसर्च आदी संस्थांचा समावेश आहे. आपल्याकडे १२०पेक्षा जास्त नागरी समाज संस्था / स्वयंसेवी संस्थांवर त्यांच्या भारतविरोधी कारवायांसाठी बंदी घालण्यात आली आहे आणि ६८०० पेक्षा जास्त नागरी समाज संस्था/स्वयंसेवी संस्था या परदेशी निधीचा गैरवापर केल्यामुळे आणि कायदेशीर तरतुदींचे उल्लंघन केल्यामुळे सरकारच्या देखरेखीखाली आहेत. नागरी समाज संस्थेच्या गैरवापराचा सर्वांत महत्त्वाचा पैलू म्हणजे ङ्गडीप स्टेट ॲक्टर्सफ तंत्रज्ञानाच्या आगमनाबरोबर डीप स्टेट ॲक्टिव्हिटी एखाद्या परकीय देशाद्वारे किंवा परकीय देशांच्या गटाद्वारे (प्रायोजक गट) स्थानिक राजकीय गट किंवा व्यक्ती, संघटना, प्रसारमाध्यमे इत्यादींच्या सहकार्याने लक्ष्यित देशाला अस्थिर करण्यासाठी किंवा



तेथे सत्ताबदल घडवून आणण्यासाठी केल्या जातात. सरकारचे नेतृत्व करणाऱ्या नेत्याविरोधात डीप स्टेट बदनामीच्या मोहिमा राबवते, त्याला हुकूमशाहा, हिटलर, सत्तेची भूक असणारा असे संबोधते. अशा वाईट प्रकारे तयार केलेल्या मोहिमांना प्रायोजक गटाकडून पेड फॉर मास मीडिया, नाममात्र नागरी तपास संस्था, पेड फॉर लोकल ग्रुप, फंडेड सीएसओ / स्वयंसेवी संस्था इत्यादींच्या वापराद्वारे समर्थन दिले जाते. भारतात घडलेल्या किंवा घडत असलेल्या सध्याच्या चिंताजनक कारवायांमधे आपत्ती प्रयोजन, नियोजित दंगली, सामूहिक निदर्शने, विकत घेतलेल्या प्रसारमाध्यमांचा माहितीच्या गैर हाताळणीसाठी वापर, माहितीयुद्ध, सरकारी घटकांकडून हेरगिरी, कायदेशीर युद्ध, व्यापारयुद्ध , सरकारांवर दबाव आणण्यासाठी स्वयंसेवी संस्था/ राजकीय पक्षांचा वापर, तंत्रज्ञान, सायकॉलॉजिकल आणि मीडिया वॉरफेअर या गोष्टींचा समावेश आहे. शाहीन बाग, सीएएविरोधी, शेतकरी आंदोलन ही त्याची ज्वलंत उदाहरणे आहेत. काही परकीय सूडबुद्धी प्रभावित ओपन फाउंडेशन्स/ संघटना/ नेटवर्क्स/ विद्यापीठेदेखील अशा भारतविरोधी कारवायांमध्ये गुंतलेली आहेत.




## पान १ वरून बातमी

पूर्वीचे बरेचसे स्थानिक लोकप्रतिनिधी चार वर्षांपासून नगरपालिकेच्या निवडणुकाच नसल्या कारणाने मरगळलेले झाल्याचे दिसून येत आहे. आता निवडणुका तर नाहीत मग कशाला लोकांची कामे करायची, या उक्तीनुसार बरेचजण वागत होते. राजकीय पक्षाच्या कार्यकर्त्यांमध्येही निवडणुका होत नसल्याने एक प्रकारचे शैथिल्य आले होते. परंतु या स्थितीतही काही सुजाण नागरिक आपल्या परिसरातील नागरिकांच्या समस्यांना घेऊन सातत्याने नगरपालिका प्रशासनाशी व अधिकाऱ्यांशी झगडताना दिसले. अनेक चांगल्या कार्यकर्त्यांनी जनतेच्या प्रश्नांना घेऊन सातत्याने आंदोलनात्मक भूमिका घेतली व प्रशासनावर दबाव ठेवण्याचे काम केले. त्यामुळे कोण चांगले आणि कोण मरगळलेले आहे, हे सूज्ञ बुलढाणेकर नागरिक जाणून आहेत. त्यामुळे आता ही खूपच चांगली सुवर्णसंधी बुलढाणेकर नागरिकांसमोर आहे.

काही माजी नगरसेवक ज्यांनी मागील कार्यकाळात आपल्या वॉर्डाचा विकास करण्याऐवजी केवळ स्वतःच्या तुंबड्या भरण्याचे काम केले आणि गेल्या चार वर्षांत जनतेच्या प्रश्नांना वाचा फोडण्याऐवजी केवळ आपली राजकीय पोळी शेकून घेण्याचा प्रयत्न केला, त्यांना आता या निवडणुकीत घरी बसवण्याची संधी बुलढाणेकरांसमोर आहे. आपल्या वॉर्डाच्या नगरसेवकाचे शिक्षण किती आहे? त्याचे चारित्र्य कसे आहे? त्याला सार्वजनिक जीवनात किती रस आहे? जनतेच्या प्रश्नांची किती जाण आहे? बुलढाणा शहराप्रति व आपल्या जनतेप्रति किती प्रेम आहे? या सर्व प्रश्नांना आपल्या डोक्यात ठेवून बुलढाणेकरांनी मतदान करण्यास जाणे गरजेचे आहे. असे झाल्यास शहराचा विकास चांगला होऊन बुलढाणा शहर पुन्हा एकदा जिल्ह्यात सुंदरतेचा आपला सन्मान परत मिळवू शकेल. सूज्ञ बुलढाणेकरांना हीच विनंती आहे की, आत्ताच या संधीचा लाभ घ्या, अन्यथा पुन्हा पाच वर्षे कपाळाला हात मारून घेण्याची वेळ येऊशकते.

*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# अजित पवारांनी मोठ्या राजकीय सस्पेन्सवर अखेर पडदा टाकला, नेमकं काय म्हणाले ?

**बारामती :** बारामती नगरपरिषदेच्या निवडणुकीत नगराध्यक्षपदाच्या निवडणुकीबाबत मोठी चर्चा गेल्या काही दिवसांपासून सुरु आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे धाकटे चिरंजीव जय पवार या निवडणुकीत आपलं नशीब आजमावणार असल्याची चर्चा होती. जय पवार हे बारामती नगरपरिषदेच्या नगराध्यक्षपदासाठी निवडणूक लढवणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सातत्याने सुरु होती. पण याबाबत खात्रीशीर माहिती समजू शकत नव्हती. त्यामुळे जय पवार निवडणूक लढवणार की नाही, याबाबत मोठा सस्पेन्स निर्माण झाला होता. अखेर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आजच्या पत्रकार परिषदेच याबाबतच्या सस्पेन्सवर मोठा पडदा टाकला आहे.

जय पवार नगराध्यक्षपदासाठी निवडणूक लढणार नाहीत, असं त्यांनी स्पष्ट केलं आहे.उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बारामती येथे माध्यमांशी संवाद साधला. जय पवार यांच्या निवडणूक लढण्याबाबात त्यांनी आज माहिती दिली. ‘जयबाबत मी तसं काही ऐकलं नाही आणि तसं काही होणार नाही‘, अशी स्पष्ट भूमिका उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मांडली आहे. पार्थ पवार यांच्या अनुपस्थितीबाबत विचारले त्याबाबात अजित पवार यांनी सांगितले की,‘पार्थ पवार समोर येत नाहीत. मी भूमिका मांडली, त्याच्या बापाने मांडली. मी मीडियासमोर बोललो. माहिती घेतल्याशिवाय बोलत नाही. मी दुसऱ्या दिवशी भूमिका मांडली.‘मधल्या काळात काही घटना घडल्या, मी माझी भूमिका स्पष्ट मांडली. चौकशी सुरू झाली आहे. वस्तुस्थिति जनतेसमोर येईल. १ रुपयाचा व्यवहार न करता कसा कागद होऊ शकतो, हे आजपर्यंत माझ्या लक्षात आले नाही. ज्याने ही नोंदणी केली, त्याने कशामुळे केले हे एका महिन्यात कळेल. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी चांगले अधिकारी चौकशी समितीत नेमले आहेत‘, अशी प्रतिक्रिया अजित पवार यांनी दिली.मागे माझ्यावर ७० हजार कोटींचा आरोप झाला, त्याला १५-१६ वर्षे गेली. निवडणुका आल्या की आमच्यावर आरोप होतात. पारदर्शकपणे काम करायचे, पण ते झाले की लगेच बारामतीतील कुठल्या जमिनीचे कागद काढायला लागतात. माझ्या नावाचा वापर करून जवळचे कार्यकर्ते किंवा नातेवाईकांनी काही सांगितले तरी ते नियमात असेल तरच अधिकाऱ्यांनी करावे.



मी सर्व वर्ष अधिकाऱ्यांना हे आवाहन करतो‘, असं अजित पवार म्हणाले. शिवसेना नेते तानाजी सावंत यांच्या आरोपांवर प्रतिक्रिया देताना अजित पवार म्हणाले, ‘विनाशकाले विपरीत बुद्धी. आम्हाला काही बोलायचे नाही. आम्ही सुसंस्कृत म्हणून राज्यात राजकारण करतो.‘ अशा शब्दांत अजित पवारांनी आरोपांच्या राजकारणावर नाराजी व्यक्त केली आणि चौकशीतून सत्य बाहेर येईल, असा विश्वास व्यक्त केला.

## दीपेश म्हात्रे यांचा भाजपात प्रवेश, ठाकरेंसह शिंदेंनाही मोठा धक्का

**ठाणे :** आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय घडामोडींना वेग आला आहे. कल्याण डोंबिवलीत तर मोठा राजकीय भूकंप घडला आहे. कारण शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे बडे नेते दीपेश म्हात्रे यांनी ठाकरे गटाला सोडचिठ्ठी देत थेट भाजपमध्ये प्रवेश केला आहे. भाजपचा हा शिवसेना उबाठा प्रमुख उद्धव ठाकरे यांच्यासह उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासाठी हा मोठा धक्का आहे. दीपेश म्हात्रे हे शिवसेना फुटीनंतर एकनाथ शिंदे यांच्या गटात होते. पण नंतर त्यांनी उद्धव ठाकरे यांच्यासोबत जाण्याचा निर्णय घेतला होता. दीपेश म्हात्रे यांचं खासदार श्रीकांत शिंदे यांच्यासोबत चांगलं नातं होतं. तसेच त्यांचे उद्धव ठाकरे यांच्यासोबतही चांगले संबंध होते. असं असलं तरी दीपेश म्हात्रे यांनी आता भाजपात प्रवेश केल्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत.

दीपेश म्हात्रे हे माजी नगरसेवक आहेत. ते कल्याण डोंबिवलीत प्रसिद्ध आहेत. त्यांचं बोलणं, वागणं हे सर्वसामान्यांना भावणारं आहे. त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांच्या मनात त्यांच्याबद्दल एक वेगळा आदर आहे. दीपेश म्हात्रे यांच्या कामाची पद्धतदेखील सर्वसामान्यांना आवडते. उद्धव ठाकरे यांच्या पक्षात दीपेश म्हात्रे असल्याने त्यांच्या पक्षाची डोंबिवलीत चांगली ताकद आहे, असं मानलं जात होतं. पण आता दीपेश म्हात्रे यांनीच ठाकरेंच्या पक्षाला सोडचिठ्ठी दिल्याने ठाकरेंच्या शिवसेनेला मोठा धक्का बसला आहे.कल्याण डोंबिवली हा भाग खरंतर एकनाथ शिंदे यांचा बालेकिल्ला मानला जातो.

## माजी आमदार शंकरराव गडाख यांची ठाकरे गटाला सोडचिठ्ठी

**अहिल्यानगर :** शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांना कठीण काळात साथ देणाऱ्या नेत्यानेदेखील यावेळी पक्षाची साथ सोडली आहे. ठाकरे गटाचे माजी आमदार शंकरराव गडाख यांनी ठाकरे गटाला सोडचिठ्ठी दिली आहे. गेल्यावर्षी विधानसभा निवडणुकीत मशाल चिन्हावर त्यांनी निवडणूक लढवली होती. पण त्यांचा पराभव झाला होता. विशेष म्हणजे महाविकास आघाडी सरकारच्या काळात शंकरराव गडाख हे राज्याचे मृदा आणि जलसंधारण विभागाचे मंत्री होते. ठाकरेंनी आपल्याला बोलावून घेत मंत्रिपदाची संधी दिली या विचाराने ते प्रभावित झाले होते. त्यामुळे त्यांनी शिवसेनेत फूट पडली तेव्हा उद्धव ठाकरेंची साथ सोडली नव्हती. याउलट त्यांनी नेवासामध्ये मेळावा घेत आपण उद्धव ठाकरेंच्यासोबत असल्याचं त्यांनी म्हटलं होतं. पण आता त्यांनी पक्षाला सोडचिठ्ठी दिली आहे. त्यामुळे



अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत.

शिवसेना पक्ष फुटल्यानंतरही अखेरपर्यंत उद्धव ठाकरे यांच्या सोबत राहिलेले नेवासाचे माजी आमदार, माजी मंत्री शंकरराव गडाख यांनी आता पक्षाला सोडचिठ्ठी दिली आहे. त्यांनी पुन्हा एकदा आपल्या क्रांतिकारी शेतकरी पक्षाकडून स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका लढवण्याचे निश्चित केले आहे. मागील विधानसभा निवडणुकीत गडाख याच पक्षाकडून निवडून आले होते. नंतर शिवसेनेत प्रवेश केला. महाविकास आघाडी सरकारमध्ये त्यांना मंत्रिपद मिळाले. पक्षफुटीनंतर ते ठाकरे यांच्यासोबत राहिले. यावेळच्या विधानसभा निवडणुकीत त्यांचा पराभव झाला. आता त्यांनी शिवसेना सोडत पुन्हा आपला पक्ष पुढे आणला आहे. विशेष म्हणजे ठाकरे गटाला आज ठाणे जिल्ह्यातील कल्याण डोंबिवली शहरातही मोठं खिंडार पडलं आहे. ठाकरेंचा कल्याणमधील जिल्हाध्यक्ष दीपेश म्हात्रे यांनी आज भाजपात प्रवेश केला. यामुळे ठाकरेंना हा मोठा धक्का मानला जात होता. या पक्षप्रवेशामुळे ठाकरेंची कल्याण डोंबिवलीमधील ताकद कमी झाली आहे. त्याचा फटका ठाकरेंना आगामी कल्याण डोंबिवली महापालिका निवडणुकीत बसण्याची शक्यता आहे. तसेच भाजपची ताकद वाढल्याने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासाठी ही मोठी डोकेदुखी आहे. त्यामुळे कल्याण डोंबिवलीतील घडामोडींची आगामी काळात चर्चा होणार आहे.

# त्यांनी एखादा बंद पडलेला साखर कारखाना घेऊन चालवून दाखवावा’, मंत्री विखे पाटील यांचं ठाकरेंना आव्हान

**अहिल्यानगर :** ‘माझ्या त्या विधानाचा आणि साखर कारखान्याचा काय संबंध. आमचा कारखाना सुरू होऊन ७५ वर्ष झाली. टीका करणाऱ्या उध्दव ठाकरे यांनी एखादा तरी कारखाना सुरू केला का? टिका करणे सोपे आहे. शेतकरी हिताचा एखादा उद्योग किंवा किमान बंद पडलेला साखर कारखाना घेऊन चालवून दाखवा,’ असं आव्हान जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी शिवसेनासेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांना दिलं.

मंत्री विखे पाटील यांनी शेतकरी कर्ज माफीसंबंधी केलेल्या विधानावरून ठाकरे यांनी विखे यांच्यावर टीका केली होती. त्यावर उत्तर देताना विखे म्हणाले, ‘आमचा डीएनए शेतकऱ्यांचा आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या विरोधात भूमिका घेण्याचा प्रश्नच नाही. माझ्या वक्तव्याचा विपर्यास करून टिका करणे सोपे आहे. मात्र, ठाकरेंनी शेतकऱ्यांसाठी काय केले ते आधी सांगावे. ग्रामपंचायत आणि सोसायटी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर माझे वक्तव्य होते. वर्षानुवर्ष ग्रामीण भागात कर्ज घेवून निवडणुका लढवल्या जातात. घेतलेल्या कर्जाची कोणतीही



उत्पादकता होत नाही. यातून तेच पुन्हा कर्जबाजारी होतात. मात्र, वक्तव्याचा अर्धाच भाग दाखवून मला शेतकरी विरोधी ठरवल्याच्या मोठ्या वेदना झाल्या’, असं विखे पाटील यावेळी म्हणालेमाझ्या ४० वर्षाच्या सार्वजनिक जीवनात कधीही शेतकऱ्यांच्या विरोधात माझी भूमिका किंवा वक्तव्य नाही. राज्यात कृषी मंत्री असताना सुरू केलेल्या असंख्य योजनांची आठवण आणि लाभ आजही शेतकऱ्यांना मिळत आहेत. अडीच वर्ष राज्यात मुख्यमंत्री म्हणून ठाकरे यांना संधी मिळाली पण एकही शेतकरी हिताचा निर्णय त्यांनी घेतला नाही. मराठवाड्यात जाऊन हेक्टरी ५० हजार कोटी रुपयांच्या मदतीची घोषणा केली होती त्याचा सोयीस्कर विसर त्यांना पडला’, असंही विखे पाटील म्हणाले. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या माध्यमातून शिवसेना संपविण्याच्या झालेल्या आरोपांवर बोलताना ते म्हणाले, ’एकनाथ शिंदे मुख्यमंत्री झाले त्यांना भाजपाचे पाठबळ होते, हे जगजाहीर आहे.

आता किती दिवस तुम्ही शिळ्या कढीला उत आणणार आहात. तुमच्याकडे तुमचं सांगण्यासाठी काहीच राहिलं नाही. त्यांच्या घरावर कोण घिरट्या घालतंय मला माहीत नाही, पण उध्दव ठाकरे स्वताभोवती घिरट्या घेत असावेत’, अशी टीकाही राधाकृष्ण विखे पाटील यांनी केली.

# इंडिकाची जोरदार धडक, तो गाडीच्या खाली अडकला, लांबपर्यंत फरफटत गेला

## रिक्षा चालकाचा हृदयद्रावक अंत




**बीड :** बीडमध्ये झालेल्या एका ऑटो रिक्षाच्या अपघातात एका व्यक्तीचा मृत्यू झाला आहे. या घटनेने परिसरात एकच खळबळ उडाली आहे. बीड जिल्ह्याच्या माजलगांव तालुक्यातील केसापुरी जवळ असलेल्या देशमुख पेट्रोल पंपा जवळ सादोळ्याकडे जात असताना हा अपघात घडल्याची माहिती आहे. यावेळी ऑटो रिक्षाला समोरून येणाऱ्या इंडिकाने धडक देत ऑटो रिक्षा (एम.एच. २३ एक्स ३३४९) चालकास फरफरट नेल्याने त्याचा जागीच मृत्यू झाल्याची घटना संध्याकाळच्या सुमारास घडली. यात एका जणाचा जागीच मृत्यू झाला असून एक जण गंभीर जखमी झाला असल्याचं समोर येत आहे. घटनेने परिसरातून हळहळ व्यक्त होत आहे.या प्रकरणी मिळालेल्या अधिक माहितीनुसार, माजलगावपासून पाच किमी अंतरावर असलेल्या केसापुरी येथील रहिवासी ओंकार जाधव आणि भाटवडगाव येथील त्याच्या साथीदार शेख अमिर इलाही (वय २५) हे साडेपाच वाजण्याच्या सुमारास ऑटो रिक्षामध्ये बसून सादोळ्याकडे कामानिमित्त जात होते. यावेळी देशमुख पेट्रोल पंपाजवळ समोरून येणाऱ्या इंडिकाने धडक दिल्याने ऑटो रिक्षा चालवत असलेला शेख अमिर इलाही हा इंडिकाच्या खालील भागात अडकला.आपल्या गाडीला अपघात झाला आहे, हे लक्षात येताच इंडिका चालकाने आपली गाडी आणखी सुसाट पळवायला सुरुवात केली. त्यामुळे गाडीखाली अडकलेला यात अडकलेला शेख अमीर इलाही हा तब्बल दीड किमी फरफटत आल्याने त्याचा मृत्यू झाल्याची घटना घडली, अशी माहिती प्रत्यक्षदर्शीनी दिली, ही घटना पाहणाऱ्यांच्या किंचाळ्या निघाल्या.यावेळी घटनास्थळी आजूबाजूच्या नागरिकांनी तात्काळ धाव घेत जखमी शेख अमीर इलाही याला तात्काळ ग्रामीण रुग्णालयात नेले. मात्र, तोपर्यंत त्याची प्राणज्योत मालवली होती. यावेळी शेख अमीर इलाही याला डॉक्टरांनी मृत घोषित केलं. तर, त्याचा साथीदार ओंकार जाधव याला खाजगी रुग्णालयात उपचार करून छत्रपती संभाजीनगर येथे पुढील उपचारासाठी पाठवण्यात आले असल्याचे सांगण्यात आले आहे. शेख अमीर इलाही याच्या मृत्यूने त्याच्या कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. सध्या पोलिसांनी या घटनेची नोंद केली असून पुढील तपास सुरु आहे.

## निर्माणाधीन ठिकाणी नेउन सहा वर्षांच्या चिमुरडीवर अत्याचार

**नांदेड :** नांदेड जिल्ह्यातील मुखेड शहरात एक धक्कादायक आणि संतापजनक घटना घडली आहे. ट्युशनहून आपल्या घराकडे जात असलेल्या एका सहा वर्षीय चिमुकलीवर नराधम युवकाने लैंगिक अत्याचार केल्याचं समोर आलं आहे. शुक्रवारी (८ नोव्हेंबर) सायंकाळी ही भयंकर घटना घडली. या प्रकारानंतर नागरिकांनी संताप व्यक्त करत पोलिस ठाण्यात मोर्चा काढून आरोपीला फाशीची शिक्षा देण्याची मागणी केली. पोलिसांनी या प्रकरणी पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. आरोपी ओमकार डाकुरवार याला पोलिसांनी अटक केली आहे.

या घटनेने मुखेड शहरात मात्र संतापाची लाट उसळली आहे.याप्रकरणी मिळालेल्या अधिक माहितीनुसार, पीडित बालिका नेहमी प्रमाणे शुक्रवारी ट्युशनला गेली होती. ट्युशन सुटल्यानंतर सायंकाळी ७ वाजेपर्यंत ती एकटी घरी परत येत होती. यावेळी रस्त्यावर थांबलेल्या आरोपी ओमकार सतीष डाकुरवार (रा. मुखेड) या नराधमाने बालिकेला गाठलं. त्यानंतर तो तिला घराचे बांधकाम चालु असलेल्या घरात घेऊन गेला आणि तिथे तिच्यावर लैंगिक अत्याचार केला.या घटनेनंतर मुलगी जखमी अवस्थेत सापडली. मुलीच्या नातेवाईकांनी तिला उपचारासाठी तात्काळ उपजिल्हा रुग्णालय नेले असता तेथील डॉक्टरांनी सदरील मुलीवर लैंगिक अत्याचार झाले असल्याचे पालकांना सांगितले. आपल्या मुलीसोबत अत्याचार झाल्याचं समजताच आई वडिलांना मोठा धक्का बसला.हा प्रकार उघडकीस आल्यानंतर मुखेडमध्ये संतापाची लाट पसरली.

दरम्यान, शनिवारी शेकडो नागरिकांनी मुखेड पोलीस ठाण्यात मोर्चा काढला. आरोपीला फाशीची देण्याची मागणी नागरिकांनी केली आहे. भाजपचे आमदार तुषार राठोड हे देखील मोर्चात सहभागी झाले होते. दरम्यान, मुखेड पोलिसांनी आरोपी ओमकार डाकुरवार यांचावर कलम ६५ (२), ६४ (२) कलम ४, ५ (च) पोक्सो बाल लैंगिक कायदा अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. पोलीस उपनिरीक्षक किरण बेंबडे हे पुढील तपास करत आहे.

## भारतातील २ 'मोस्ट वॉन्टेड' गुंडांना अमेरिकेत ठोकल्या बेड्या ; 'या' गँगशी असलेला संबंध उघड



**जॉर्जिया :** परदेशात पळून जाऊन सक्रिय असलेल्या देशातील दोन मोस्ट वाँटेड गँगस्टरना अटक करण्यात आल्याने भारतीय सुरक्षा दलाला मोठे यश मिळाले आहे. हरियाणा पोलिसांसह भारतीय सुरक्षा अधिकाऱ्यांनी वेंकटेश गर्ग याला जॉर्जियामध्ये तर भानू राणा याला अमेरिकेत ताब्यात घेतले. भानू राणा हा कुख्यात लॉरेन्स बिश्नोई गँगशी जोडलेला असल्याचे अनेक तपासांमध्ये स्पष्ट झाले आहे. दोघांनाही लवकरच भारतात परत आणले जाणार असून त्यांच्यावर कायदेशीर कारवाई होणार आहे. सध्या भारतातील दोन डझनपेक्षा जास्त मोठे गुन्हेगार देशाबाहेरून काम करत आहेत; हे सर्व परदेशात बसून आपल्या टोळ्यांसाठी युवकांची भरती करत आहेत. वेंकटेश गर्ग हा हरियाणातील नारायणगडचा रहिवासी असून त्याच्यावर भारतात दहा पेक्षा अधिक गंभीर गुन्हे दाखल आहेत. गुरुग्राममध्ये एका नेत्याच्या हत्येनंतर तो भारतातून फरार झाला होता. नंतर, त्याने जॉर्जियामध्ये आश्रय घेतल्याचे समोर आले. हरियाणा, राजस्थान, दिल्ली आणि उत्तर भारतातील इतर राज्यांतील युवकांना तो आपल्या टोळीत सामील करत होता. कपिल सांगवान या दुसऱ्या गँगस्टरसोबत मिळून गर्ग मोठे रॅकेट चालवत होता. सांगवानदेखील सध्या परदेशात राहत असून दोघांनी मिळून भारतात गुन्हेगारीचं जाळं उभं केल्याचा संशय आहे. गर्गच्या अटकेनंतर त्याच्या कामकाजाची पद्धत, भरतीचा मार्ग, पैशांची हालचाल आणि परदेशातून दिले जाणारे आदेश याबाबत सुरक्षा यंत्रणांना महत्त्वपूर्ण माहिती मिळाली आहे.भानू राणा हा हरियाणातील करनालचा रहिवासी असून अनेक वर्षांपासून अमेरिकेत राहत होता. राणावर हरियाणा, पंजाब आणि दिल्ली या राज्यांमध्ये अनेक गंभीर गुन्ह्यांची नोंद आहे. लॉरेन्स बिश्नोई गँगशी त्याचे संबंध असल्याचे पुरावे याआधीच समोर आले होते. पंजाबमधील एका ग्रेनेड हल्ल्याच्या तपासातही राणाचे नाव मुख्य सूत्रधार म्हणून उघड झाले.दोघांना भारतात परत आणल्यानंतर त्यांच्या माध्यमातून परदेशातून चालवल्या जाणाऱ्या गुन्हेगारी नेटवर्कचा अधिक सखोल उलगडा होण्याची शक्यता आहे. भारतीय एजन्सींच्या या कारवाईमुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर सक्रिय भारतीय गँगस्टर्सच्या जाळ्यावर मोठा धक्का बसल्याचे तज्ज्ञांचे मत आहे.

## आईचा मृत्यू, मुलगा संतापला, डॉक्टरांवर हल्ला ; कूपर रुग्णालयातील प्रकार



**मुंबई :** जुहू येथील कूपर रुग्णालयात मृत्यू झालेल्या रुग्णाच्या मुलाने दोन डॉक्टरांवर हल्ला केल्याची घटना घडली आहे. सहकाऱ्यांना वाचवण्याचा प्रयत्न करताना तिसऱ्या डॉक्टरलाही दुखापत झाली. ही घटना शुक्रवारी (७ नोव्हेंबर) रात्री घडल्याची माहिती आहे.

या घटनेनंतर, निवासी डॉक्टर आणि इंटर्नसनी मास कॅज्युअल लीव्ह पाळली. बीएमसी मार्ड (मेडिकल असोसिएशन ऑफ रेसिडेंट डॉक्टर्स) ने बीएमसी प्रशासनाला सोमवारी संध्याकाळी ५ वाजेपर्यंत सुरक्षा व्यवस्था सुधारण्यासाठी आणि संवेदनशील ठिकाणी सशस्त्र सुरक्षा कर्मचारी तैनात करण्यासाठी मुदत दिली आहे. ज्यामुळे सर्व नागरी रुग्णालयांमध्ये सामूहिक रजेचा इशारा देण्यात आला आहे.अंधेरी येथील रहिवासी साजीदा शेख (५७) हिला गंभीर अवस्थेत अपघात विभागात आणण्यात आले होते आणि कर्तव्यावर असलेले डॉक्टर डॉ. गौरव आनंदगावकर (२५) आणि एका इंटर्नने दिलेल्या सीपीआरला तिने प्रतिसाद दिला नाही. त्यानंतर डॉक्टरांनी रुग्णाला मृत घोषित केले. तेव्हा तिचा मुलगा समीर अब्दुल जब्बार शेख आक्रमक झाला आणि त्याने डॉक्टरांवर हल्ला केला, असे असोसिएशन ऑफ स्टेट मेडिकल इंटर्न्स (एएसएमआय) ने जारी केलेल्या निवेदनात म्हटले आहे. सीएमओ डॉ. गौरव आनंदगावकर यांच्या चेहऱ्यावर अनेक वार करण्यात आले. इंटर्न डॉ. प्रशांत भडके यांच्यावर हल्ला करण्यात आला आणि निवासी डॉ. करण यांना त्यांच्या सहकाऱ्यांना वाचवण्याचा प्रयत्न करताना चेहरा, डोळे, छाती आणि पोटात जोरदार दुखापत झाली,' असं या निवेदनात म्हटलं आहे.जुहू पोलिसांनी समीर शेखवर वैद्यकीय कर्मचाऱ्यांना शिवीगाळ, मारहाण आणि धमकी दिल्याबद्दल गुन्हा दाखल केला आहे, परंतु नोटीस बजावल्यानंतर त्याला सोडून देण्यात आले.

'आरोपीने असा दावा केला आहे की डॉक्टरांनी निष्काळजीपणा दाखवला आणि उपचार देण्यास उशीर केला ज्यामुळे त्याच्या आईचा जीव गेला,' असे जुहू पोलिस ठाण्यातील एका पोलिस अधिकाऱ्याने सांगितले.

# युवराज सिंगने अभिषेकची कोणालाच माहित नसलेली गोष्ट जगाला सांगितली

**मुंबई :** भारत आणि ऑस्ट्रेलिया टी-२० मालिका पार पडली असून त्यातील दोन सामने पावसामुळे रद्द झाले. भारतीय संघाने ही मालिका २-१ ने जिंकली आहे. स्टार खेळाडू अभिषेक शर्मा याला प्लेयर ऑफ द सीरीज म्हणून गौरवण्यात आले. अभिषेकची सर्वत्र चर्चा होत असताना त्याचा गुरू असलेल्या माजी खेळाडू युवराज सिंग याने मोठी गोष्ट जगाला सांगितली आहे. अभिषेकबद्दलची ही गोष्ट फार कमी लोकांना माहिती होती. युवराज सिंहने त्याबद्दल खुलासा केलाय. युवराज सिंगने काय सांगितलं जाणून घ्या.युवराज सिंग आणि अभिषेक शर्मा यांच्यातील गुरु-चेला नात्याबद्दल सर्वांनाच माहिती आहे. युवराज सिंग जेव्हा आपल्या कारकिर्दीच्या शेवटच्या टप्प्यात होता, तेव्हापासून त्याने अभिषेक शर्मा आणि शुभमन गिल या दोघांनाही घडवण्यास सुरुवात केली होती. आज हे दोन्ही खेळाडू केवळ भारतातच खेळत नाहीत, तर भारतीय संघाच्या विजयातही महत्त्वाची भूमिका बजावत आहेत.युवराज सिंगने अभिषेक शर्माच्या हट्टीपणाबद्दल सांगितले आहे. तो म्हणाला की, अभिषेक अशी एक गोष्ट आहे ज्यासाठी मार खाईल, मरेल पण ती करणार नाही. युवराज सिंगने या सर्व गोष्टींचा उल्लेख कॅमेऱ्यासमोर केला आहे. युवराज सिंगच्या इंस्टाग्रामवर त्याच्या एका मुलाखतीची क्लिप आहे, ज्यामध्ये तो अभिषेक शर्माच्या हट्टीपणाबद्दल खुलासा करतो. युवराज हे सर्व सांगत असताना अभिषेक शर्मा देखील तिथेच उपस्थित






होता.युवराज सिंगच्या मते, अभिषेक शर्मा त्याच्या बॅटबद्दल खूपच हट्टी आहे. तो ती कोणासोबतही शेअर करत नाही. तो इतरांच्या बॅट घेतो, पण स्वतःचा बॅट कोणालाही देत नाही. मरेल, मार खाईल पण तो बॅट देणार नाही. त्याच्या किट बॅगमध्ये १० बॅग असतील तरी तो म्हणेल की २ बॅट आहेत. मग त्याच्या किट बॅगमधून आणखी ४ बॅट निघतील.ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर नुकत्याच पार पडलेल्या टी-२० मालिकेचा अभिषेक शर्मा हिरो ठरला आहे. त्याला 'प्लेअर ऑफ द सिरीज' म्हणून निवडण्यात आले आहे. मालिकेत सर्वाधिक धावा केल्याबद्दल अभिषेक शर्माला हा पुरस्कार मिळाला आहे. यापूर्वी, अभिषेक टी-२० फॉरमॅटमध्ये खेळल्या गेलेल्या आशिया कपमध्येही 'प्लेअर ऑफ द टूर्नामेंट' निवडला गेला होता. याच कारणांमुळे अभिषेक शर्मा टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये जगातील नंबर १ फलंदाज आहे.

## टॉस गमावण्याचा सूर्यकुमार- बुमराहचा संवाद व्हायरल

**गाबा :** भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात टी-२० सामन्यांची मालिका खेळवली गेली. मालिका भारताने २-१ ने जिंकली. मालिकेतील दोन सामने पावसामुळे रद्द झाले. भारताने वनडे मालिका गमावली होती पण टी-२० मालिका जिंकली. पण या मालिकेत भारताने टॉस गमावण्याच्या बाबतीत विक्रमच केला. या मालिकेत सूर्याला फक्त एकदा टॉस जिंकता आला. पण आता यावरुन जसप्रीत बुमराहने सूर्याला कसं डिवचलं ते पाहा...पाचव्या टी-२० सामन्यात भारताने ऑस्ट्रेलियाविरुद्ध पुन्हा एकदा टॉस गमावल्यानंतर, कर्णधार सूर्यकुमार यादवने स्टार वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराहशी मजेदार संवाद साधला. याचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला. ऑस्ट्रेलियामध्ये भारताने आठपैकी सात टॉस गमावले. गिलने तिन्ही एकदिवसीय सामन्यांमध्ये टॉस गमावला, तर सूर्यकुमारने पाच सामन्यांच्या टी-२० मालिकेत फक्त एकदाच विजय मिळवला. शनिवारी, नाणे ऑस्ट्रेलियाचा कर्णधार मिशेल मार्शच्या बाजूने पडले.सूर्यकुमार त्याच्या सहकाऱ्यांकडे वळला आणि बुमराह विचारताना दिसला, 'पुन्हा हरला?'. यानंचतर ते दोघेही हसताना दिसले. याचा व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाला. भारताने ऑस्ट्रेलियाविरुद्ध पाच सामन्यांची टी-२० मालिका २-१ ने जिंकली. पाचवा आणि शेवटचा सामना पावसामुळे रद्द करण्यात आला. भारताची सुरुवात चांगली




झाली, सलामीवीर अभिषेक शर्मा आणि शुभमन गिल यांनी आक्रमक सुरुवात केली.पावसामुळे खेळ रद्द करावा लागला. फक्त ४.५ षटके खेळल्यानंतर पुन्हा पाऊस सुरू झाला. खराब हवामानामुळे सामना पुन्हा सुरू होऊ शकला नाही. ऑस्ट्रेलियन भूमीवर पाच टी-२० मालिकेतील भारताचा हा तिसरा विजय होता. ऑस्ट्रेलियाने पहिलाच सामना जिंकला. यानंतर दुसरा सामना पावसामुळे रद्द झाला तर तिसरा सामना भारताने जिंकला. चौथा सामना ही भारताने जिंकला. पाचवा सामनाही पावसामुळे रद्द करावा लागला. आता भारत पुन्हा टी-२० मालिका दक्षिण आफ्रिकेविरुद्ध खेळेल. ९ डिसेंबरला पुढील महिन्यात टी-२० मालिका सुरु होईल. या मालिकेतही पाच सामने असणार आहेत.

## भारताला ट्रॉफी मिळवून देण्यासाठी आयसीसीचे मोठे पाऊल

**दिल्ली :** वर्ल्ड कप जिंकलेल्या भारतीय महिला क्रिकेट संघाच्या कौतुक सोहळ्याऐवजी बीसीसीआयने आशिया कप टी-२० क्रिकेट स्पर्धेतील विजेतेपदाचा करंडक भारतात आणण्यास प्राधान्य दिले. आयसीसीच्या बैठकीत आता आशिया कपच्या ट्रॉफीबाबत तोडगा करण्यात आला आहे. आयसीसीने आता एक मोठे पाऊल उचलले आहे. आयसीसीने आता एका समितीची नियुक्ती केली आहे. ही समिती आता याबाबतची संपूर्ण चौकशी करेल आणि त्यानंतर आयसीसी त्यावर निर्णय घेणार आहे. या बैठकीला पाकिस्तानचे मोहसिन नक्वी उपस्थित होते. पण त्यांनी या विषयावर बोलणे टाळले.बीसीसीआयने आशिया कप टी-२० क्रिकेट स्पर्धेतील विजेतेपदाचा करंडक अद्याप न मिळाल्याची तक्रार केली



होती. यावर अनौपचारिक चर्चा झाली. अनेक सदस्यांनी करंडक विजेत्या संघाला न दिल्यास क्रिकेटची प्रतिमा खालावेल, अशी चिंता व्यक्त केली. मात्र, आयसीसीने भारत आणि पाकिस्तान हे जागतिक क्रिकेटसाठी महत्त्वाचे असल्याने दोघांनी चर्चा करून हा प्रश्न सोडवावा, अशी सूचना केली. तसेच, हा प्रश्न सोडवण्यासाठी तीन सदस्यीय समिती स्थापन केली आहे.या समितीचे अध्यक्ष ओमान क्रिकेट बोर्डाचे अध्यक्ष पंकज खिमजी असतील.

# अमोल मुझुमदार यांच्यावर महाराष्ट्र सरकारचाही अन्याय, खेळाडूंना २.२५ कोटी पण विश्वविजयाच्या शिल्पकाराला किती दिले

**मुंबई :** अमोल मुझुमदार यांच्यावर एक खेळाडू म्हणून तर अन्याय झालाच, पण आता तर ते भारताच्या विश्वविजयाचे शिल्पकार ठरले. पण त्यानंतरही अमोल मुझुमदार यांच्यावर महाराष्ट्राच्या सरकारने रोख पारितोषिक देताना अन्याय केला असल्याचे म्हटले जात आहे.

अमोल मुझुमदार हे गेल्या दोन वर्षांपासून भारताच्या वर्ल्ड कप विजेत्या संघाचे प्रशिक्षक आहेत. भारतीय संघाला वर्ल्ड कपचे स्वप्न हे अमोल मुझुमदार यांनी दाखवले आणि खेळाडूंनी ते प्रत्यक्षात उतरवले. खेळाडू हे महत्वाचेच असतात. पण ते त्यांची वैयक्तिक कामगिरी करत संघाच्या विजयात हातभार लावत असतात. पण प्रशिक्षकांना तर प्रत्येक खेळाडूचा वेगवेगळा विचार करावा लागतो आणि त्यानुसार प्रत्येक खेळाडूला वेगवेगळ्या गोष्टी सांगाव्या लागतात. त्यामुळे एका बाजूने पाहिले तर खेळाडूंपेक्षा प्रशिक्षकांचा विजयात मोठा वाटा असतो. पण हे असे असले तरी महाराष्ट्र सरकारने जेव्हा रोख पारितोषिक दिले, तेव्हा अमोल मुझुमदार यांच्यावर अन्याय केल्याचे समोर आले आहे.महाराष्ट्राच्या सरकारने तीन खेळाडूंसह अमोल मुझुमदार यांचा सत्कार केला. यामध्ये भारताची उपकर्णधार स्मृती मानधना, जेमिमा रॉड्रीग्ज आणि राधा यादव यांचा समावेश होता. महाराष्ट्र सरकारने या तिघींना २.२५ कोटी रुपये दिले आहेत. ही चांगलीच गोष्ट आहे. पण रोख पारितोषिक देताना महाराष्ट्राच्या सरकारने अमोल मुझुमदार यांच्यावर अन्याय केला आहे. कारण महाराष्ट्राच्या सरकारने अमोल मुझुमदार यांना २२.५० लाख रुपये दिले असल्याचे आता समोर येत आहे. अमोल मुझुमदार यांनी तर भारताच्या संपूर्ण संघाला मार्गदर्शन केले, त्यामुळे त्यांना सर्वाधिक रोख पारितोषिक मिळालायला हवं होतं, असे म्हटले जात आहे. पण यावेळी त्यांना खेळाडूंएवढे समान रोख पारितोषिकही देण्यात आलेले नाही. त्यामुळे काही चाहते महाराष्ट्राच्या सरकारवर नाराज आहेत आणि त्यांना अमोल मुझुमदार यांच्यावर पुन्हा एकदा अन्याय झाल्याचे वाटत आहे.वर्ल्ड कप विजेत्या खेळाडूंचे सर्व राज्य सरकार सत्कार करत आहेत. पण भारताचे प्रशिक्षक हे महाराष्ट्राचे आहेत. पण तरीही त्यांच्यावर अन्याय झाल्याचे आता म्हटले जात आहे. त्यामुळे अमोल मुझुमदार यांच्याबाबत महाराष्ट्र सरकार फेरविचार करणार का, याची उत्सुकता आता सर्वांना असेल






दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# तन्वीने सांगितला शशांकबरोबर काम करण्याचा अनुभव



**मुंबई :** तन्वी मुंडले मराठी मालिकाविश्वातील लोकप्रिय अभिनेत्री आहे. पाहिले न मी तुला ही तिची पहिलीवहिली मालिका. त्यामध्ये तिने नायिकेची भूमिका साकारलेली. त्या मालिकेमध्ये अभिनेता शशांक केतकर आणि आशय कुलकर्णी हे कलाकार तिच्यासह महत्त्वपूर्ण भूमिकांत होते. अशातच आता तिने शशांकबरोबर काम करण्याचा अनुभव सांगितलं आहे.

तन्वी मुंडले ही मूळची कोकणातली. परंतु, अभिनय क्षेत्रामुळे आता ती मुंबईत स्थायिक झाली आहे. तन्वीने आजवर मालिकांमध्ये नायिकेची भूमिका साकारली असून, सध्या ती संकर्षण कऱ्हाडेबरोबर 'कुटुंब किर्तन' या नाटकात काम करीत आहे. नुकतीच तिने लोकप्रिय अभिनेत्री सुलेखा तळवलकरला मुलाखत दिली. त्यामध्ये तिने तिच्या पहिल्या मालिकेचा अनुभव सांगितला आहे. सुलेखा यांनी तिला सहकलाकारांबद्दल काय सांगशील ? पहिल्या मालिकेत शशांक केतकरसारखा अतिशय गुणी कलाकार आणि आशय कुलकर्णीसारखा मस्तीखो कलाकार लाभले ; तर हे लोक सेटवर तुला त्रास द्यायचे का, असा प्रश्न विचारला. त्यावर तन्वी म्हणाली, मजाच. मी तेव्हा सेटवर सगळ्यात लहान होते. त्यामुळे ते माझी खूप मस्करी करायचे. काही झालं तरी हिला छळा, हिला त्रास द्या ; पण मीही मजा करायचे तेव्हा. तन्वी पुढे शशांकबरोबर काम करण्याचा अनुभव सांगत म्हणाली, ङ्गशशांक केतकर म्हणजे मलाच दडपण आलं होतं तेव्हा. कारण– होणार सून मी ह्या घरची ही त्याची मालिका मी पाहिली होती, जेव्हा माझा या क्षेत्राशी काही संबंध नव्हता. त्यानंतर माझी पहिलीच मालिका, ज्यामध्ये तोच आहे. त्यामुळे माझ्यासाठी खूप मोठी गोष्ट होती ती आणि तेव्हा मला कळत नव्हतं की, त्याला काय म्हणू शशांकसर म्हणू की काय म्हणू. कारण– सर म्हटलं की, दबून राहू वगैरे ; मग कसं काम करणार ? पण, तो खूप छान आहे आणि त्यामुळे मला दडपण नाही आलं. त्यात पहिलीच मालिका आणि आपणच त्यात नायिका आहोत. अशी सगळी ओझी होती डोक्यावर.

# गिरिजाने सांगितला 'या' बॉलीवूड अभिनेत्याबरोबर इंटिमेट सीनचा अनुभव

**मुंबई :** गिरिजा ओक मराठी इंडस्ट्रीतील लोकप्रिय अभिनेत्री आहे. पण, म राठीसही तिने हिंदीतही महत्त्वपूर्ण भूमिका साकारल्या आहेत. गिरिजा येत्या काळात 'थेरिपी शेरिपी' या वेब सीरिजमधून झळकणार आहे. अशातच तिने या सीरिजसाठी इंटिमेट सीन करतानाचा अनुभव सांगितला आहे.

'शैतान', 'कांतारा चॅप्टर १', 'उलझ' या चित्रपटांमध्ये काम केलेला अभिनेता म्हणजे गुलशबदब. गुलशन व गिरिजा 'थेरिपी शेरिपी' या सीरिजमधून एकत्र झळकणार आहेत. अशातच अभिनेत्रीने गुलशनबरोबर इंटिमेट सीन करण्याचा अनुभव सांगितला आहे.

गिरिजाने या सीरिजमध्ये गुलशनबरोबर काम करण्याचा अनुभव सांगत तिने गुलशनचे कौतुक केले आहे. त्याच्याबरोबर काम करण्याचा तिचा अनुभव छान असल्याचे तिने म्हटले आहे. गिरिजा याबद्दल म्हणाली, सीरिज असो किंवा चित्रपट जेव्हा केव्हा इंटिमेट सीन असतो तेव्हा तिथे इंटिमेट को-ऑर्डिनेटर असतात. वातावरण तुम्हाला अनुकूल वाटेल, असंच असतं. सीन करण्यापूर्वी तो कसा करायचा आहे याबद्दल चर्चा केली जाते. पण, इतकं सगळं असतानाही काही वेळा असे सीन करताना अवघडल्यासारखं वाटू शकतं.

गिरिजा पुढे म्हणाली, ङ्गएकदा कॅमेरा सुरू झाला की, तुम्ही कदाचित अवघडलेल्या परिस्थितीत अडकू शकता की, सीन करीत राहायचं आहे की थांबायचं आहे, हे बरोबर होत आहे की नाही वगैरे. गिरिजा पुढे म्हणाली, काही वेळेला असे लोक असतात की, ज्यांच्याबरोबर काम करताना तुम्हाला संकोच वाटत नाही. गुलशन त्यातील एक आहे. त्यानं त्याच्या व्हॅनिटी व्हॅनमधून तीन ते चार वेगवेगळ्या उशा आणल्या होत्या आणि मला त्यातली जी आवडेल, ती घ्यायला सांगितली. तो पूर्ण सीन करताना त्यानं निदान १६-१७ वेळा मला विचारलं असेल की, मी ठीक आहे की नाहीये.



गिरिजा पुढे सहकलाकाराचं कौतुक करीत म्हणाली, ङ्गतो पूर्ण सीन करताना त्यानं खूप काळजी घेतली तो होता म्हणून तो सीन करणं सोपं गेलं. तो खूप चांगला माणूस आहे. आज मी याबद्दल असं उघडपणे बोलू शकते. कारण– त्यानं तितक्या आदरपूर्वक काळजी घेत तो सीन केला.

दरम्यान, गिरिजा व गुलशन यांच्या 'थेरिपी शेरिपी' या सीरिजचं दिग्दर्शन सचिन पाठकने केले आहे. त्यामध्ये नेहा धुपियासुद्धा आहे. या सीरिजची रीलिज डेट अद्याप जाहीर करण्यात आलेली नाही.



# 'काल त्रिघोरी' १४ नोव्हेंबरला येणार




**मुंबई :** सध्या मॅडॉकचा हॉरर कॉमेडी चित्रपट 'थामा' प्रेक्षकांची गर्दी खेचत आहे. आता याला टक्कर देण्यासाठी चालू महिन्यात 'काल त्रिघोरी' नावाचा सुपरनॅचरल हॉररपट प्रदर्शित होणार आहे. अरबाज खान, ऋतुपर्णा सेनगुप्ता, महेश मांजरेकर आणि आदित्य श्रीवास्तव यांची मुख्य भूमिका असलेल्या या चित्रपटाचा टीझर अनब ट्रेलर प्रदर्शित करण्यात आला आहे. एका रहस्यमय वाड्याच्या अवतीभवती याची कहाणी गुंफण्यात आली आहे. या वाड्यात जाणाऱ्या लोकांसोबत विचित्र घटना घडत असतात. तेथील बाहुलीला स्पर्श न करण्याचा सल्ला देण्यात आलेला असतो, असे टीझरमध्ये दाखविण्यात आले आहे. हा चित्रपट १४ नोव्हेंबर रोजी प्रदर्शित होईल. चित्रपटाचे दिग्दर्शन नितिन वैद्य यांनी केले असून त्यांनीच याची कहाणी लिहिली आहे. तर शिरीष वैद्य, नितिन घटालिया आणि मानसुख तलसानिया यांनी याची निर्मिती केली आहे. चित्रपटात राजेश शर्मा, मुग्धा गोडसे आणि अन्य कलाकारही मुख्य भूमिका साकारत आहेत. अरबाज खान या चित्रपटातून भेटीला येणार असल्याने त्याचे चाहते उत्सुक झाले आहेत.

# 'बंगाराम' चित्रपटात समांथा

**मुंबई :** राज निदिमोरू, समांथा रुथ प्रभू आणि हिमांक डुव्वुरु यांनी स्वत:चा बॅनर त्रालाला मूव्हिंग पिक्चर्स अंतर्गत 'मां इंति बंगाराम' चित्रपटाचे चित्रिकरण सुरू केले आहे. याची छायाचित्रे समांथाने सोशल मीडिया हँडलवर शेअर केली आहेत. या छायाचित्रांमध्ये समांथाचा कथित बॉयफ्रेड राज निदिमोरूही दिसून आला आहे. प्रेम आणि आशीर्वादासोबत मां इंति बंगारामच्या मूहुर्तासोबत स्वत:चा प्रवास सुरू केला आहे. आम्ही जे निर्माण करत आहोत, त्याला तुमच्यासोबत शेअर करण्यासाठी उत्सुक आहे. या विशेष चित्रपटाच्या सुरुवातीला आम्हाला तुमचे प्रेम आणि समर्थनाची आवश्यकता आहे, असे समांथाने स्वत:च्या पोस्टमध्ये नमूद पेल आहे. हा चित्रपट १९८० च्या दशकातील पार्श्वभूमीवर आधारित एक रोमांचक क्राइम थ्रिलर आहे. समांथा ही 'मां इंति बंगाराम'च्या व्यतिरिक्त नेटफ्लिक्सवर प्रदर्शित होणाऱ्या 'रक्तब्रह्मांड : द ब्लडी किंगडम' या सीरिजमध्ये दिसून येणार आहे. यापूर्वी समांथा ऊथ प्रभू ही स्वत:च्या प्रॉडक्शन हाउस अंतर्गत निर्मित पहिला चित्रपट 'शुभम'मध्येही पाहुण्या कलाकाराच्या भूमिकेत दिसून आली होती.

# श्रद्धा कपूर बनणार डिज्नीच्या कार्टून पात्राचा आवाज



**मुंबई :** बॉलीवूड अभिनेत्री श्रद्धा कपूर आता एका हटके अंदाजात प्रेक्षकांच्या समोर येणार आहे. श्रद्धा डिस्नेच्या झोटोपिया २ च्या हिंदी भागाचा आवाज बनली आहे. ज्युडी होप्सच्या व्यक्तिरेखेला श्रद्धाचा आवाज लाभला आहे. अलीकडेच डिस्नेने त्यांच्या सोशल मीडिया पेजवरुन श्रद्धाचा आणि ज्युडीचा एक फोटो शेयर केला आहे.

आपल्या पोस्टमध्ये ती म्हणते, 'झोटोपीया २ परिवारात दाखल होण्यासाठी खूप जास्त उत्साहित आहे. ज्युडी होप्सच्या आवाज बनून. ती साहसी आणि उत्साही आहे. प्रेमळ आहे. तुमच्यासाठी येत आहे एक अनोखे सरप्राइज! येत आहे झोटोपिया २. थिएटरमध्ये २८ नोव्हेंबरला.' श्रद्धाच्या या पोस्टवर तिच्यावर अनेकांनी अभिनंदनाचा वर्षाव केला आहे. मावशी पद्मिनी कोल्हापुरे या पोस्टच्या कमेंटमध्ये म्हणते, 'वाट पाहू शकत नाही! तसेही तू आमच्या आयुष्यातील खरेखुरे कार्टून कॅरॅक्टर आहेस.'

बॉलीवूड प्रोजेक्टबाबत बोलायचे झाल्यास श्रद्धा कपूर आगामी स्त्री ३ मधून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. हा सिनेमा २०२७ मध्ये रिलीज होणार आहे. मडॉक हॉरर युनिव्हर्समधील स्त्री फ्रँचाईजीमधील हा तिसरा सिनेमा आहे. याशिवाय नगिन या फॅटसी ट्रायोलॉजीमध्येही ती दिसणार आहे. याशिवाय ती प्रसिद्ध लावणी नर्तिका विठाबाई नारायणगांवकरच्या बायोपिकमध्ये दिसणार आहे. 'विठा' असे या बायोपिकचे नाव आहे.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# निबंध व चित्रकला स्पर्धांचा बक्षीस वितरण सोहळा थाटात...

## जिल्हा पोलिस दल आणि जिल्हा पत्रकार संघ आयोजित मिशन परिवर्तन स्पर्धेत हजारो विद्यार्थ्यांचा सहभाग

जनसंचलन/बुलढाणा

बुलढाणा जिल्हा पोलिस दल आणि बुलढाणा जिल्हा पत्रकार संघ अंतर्गत वृत्तेश्वर गणेशोत्सव मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने ङ्गमिशन परिवर्तनफ अंतर्गत नशामुक्ती विषयाला घेऊन ऑगस्ट सप्टेंबर २०२५ मध्ये झालेल्या निबंध चित्रकला स्पर्धेचा बक्षीस वितरण समारोह आज ८ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजता प्रभा हॉल, पोलिस मुख्यालय बुलढाणा येथे आयोजित करण्यात आला होता. यावेळी जिल्हा पोलिस अधीक्षक निलेश तांबे, जिल्हा अपर पोलिस अधीक्षक अमोल गायकवाड, जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष रणजीतसिंग राजपूत यांच्या प्रमुख उपस्थितीत बक्षीस वितरण करण्यात आले. निबंध व चित्रकला स्पर्धेचे परिक्षण करणाऱ्या परिक्षकांचा यथोचित सन्मान करण्यात आला. सायबर सुरक्षेबाबत पथनाटय सादर करण्यात आले. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक सुनिल अंबुलकर यांनी या कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले.

यावेळी जिल्हा पोलिस अधीक्षक निलेश तांबे यांनी संबोधित करतांना सांगितले की, बुलढाणा जिल्ह्यात मिशन परिवर्तन अंतर्गत विविध उपक्रम राबविल्या जात आहे. त्यामध्ये निबंध व चित्रकला स्पर्धा सुध्दा जिल्हा पोलिस दल आणि जिल्हा पत्रकार संघ यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आली. याला जिल्हा भरातून उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला त्याबद्दल त्यांनी आभार मानले व जिल्हा पोलिस दल आणि जिल्हा पत्रकार संघाचे कौतुक केले. विद्यार्थ्यांनी आयुष्यात चार ङ्गआरफ चा अवलंब केला पाहिजे






त्यामध्ये रिड, रिव्हाइस, रिप्रोड्यूस, रिझल्ट याचा समावेश आहे. एसपी श्री.तांबे यांनी उपस्थितांना नशामुक्तीचे शपथ दिली. अपर पोलिस अधीक्षक अमोल गायकवाड यांनी आपल्या भाषणातून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी नशा पासून दूर राहिले पाहिजे. आपणास जर कुणी बळजबरीने नशा करण्यास भाग पाडत असेल तर त्याला बळी पडू नाही. कुठलीही नशा आरोग्यास धोकादायक आहे. नशा नाही तर योग्य दिशा आयुष्यला देता आली पाहिजे जिल्हा पोलिस दल आणि जिल्हा पत्रकार संघ यांनी संयुक्तीकरित्या राबविलेल्या चित्रकला स्पर्धा आणि निबंध स्पर्धा यामाध्यमातून विद्यार्थ्यांच्या मनात नशा करण्याचे दुष्परिणाम याबद्दल जनजागृती झाली. जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष रणजीतसिंग राजपूत यांनी आपल्या मनोगतातून सांगितले की, निबंध स्पर्धा आणि चित्रकला स्पर्धेला जिल्हा भरातून चांगल्या प्रकारचा प्रतिसाद मिळाला. निबंध स्पर्धेने तर नविन उच्चांकच घाटला आहे. तब्बल आठ ते नऊ हजार विद्यार्थ्यांनी या स्पर्धांमध्ये भाग घेऊन विक्रम रचला आहे. जिल्हा पोलिस दल आणि जिल्हा पत्रकार संघ यापुढे सुध्दा मिळून चांगले उपक्रम जिल्हाभरात राबवू असा विश्वास व्यक्त केला. यावेळी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक सुनिल अंबुलकर, बुलढाणा शहर पोलिस स्टेशनचे ठाणेदार रवी राठोड, पोलिस कल्याण शाखेचे श्री.पावरा, पोलिस उपनिरीक्षक विजय हुडेकर, जिल्हा पत्रकार हल्ला विरोधीचे समन्वयक राजेश डिडोळकर, जिल्हा पत्रकार संघाचे जेष्ठ मार्गदर्शक सुधाकर अहेर, जिल्हा पत्रकार संघाचे सरचिटणीस कासिम शेख, कार्याध्यक्ष वसिम शेख, सचिव शिवाजीराव मामलकर, रविंद्र गणेशे, कोषाध्यक्ष ब्रम्हानंद जाधव, प्रेमकुमार राठोड, सुधाकर मानवतकर, पवन सोनारे, डॉ.भागवत वसे, राम हिंगे, अजय काकडे, माँ जिजाऊ अर्बनचे उपाध्यक्ष शिवाजीराव तायडे, ॲड.रमेश भागिले, भूषण पंजाबी, पोलिस दलातील ज्योती राठोड, रेखा बकाल यांच्यासह पोलिस कर्मचारी, जिल्हा पत्रकार संघाचे पदाधिकारी, शिक्षक, पालक, विद्यार्थी यांच्यासह इतरांची मोठया संख्येने उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे योग्य आणि सुत्रबध्द सुत्रसंचलन डॉ.गायत्री सावजी यांनी केले तर कार्यक्रामाचे आभार प्रदर्शन जिल्हा पत्रकार संघाच्या महिला सेलच्या जिल्हाध्यक्ष मृणाल सावळे यांनी केले

# महाराष्ट्र बॉक्सिंग असोसिएशन निवडणूक कवळी-दरेकर पॅनेलचे सर्व उमेदवार विजयी...

## महाराष्ट्र बॉक्सिंग असोसिएशनच्या अध्यक्षपदी भाजपा आ. प्रविण दरेकर बहुमतांनी विजयी कार्याध्यक्ष पदी विठ्ठलराव लोखंडकार

वृत्तसंस्था/मुंबई

आज वरळी येथील सासमिरा इन्स्टिट्यूट ऑफ टेक्सटाईल येथे महाराष्ट्र बॉक्सिंग असोसिएशनच्या पार पडलेल्या निवडणुकीत महाराष्ट्र बॉक्सिंग संघटनेचे माजी अध्यक्ष जय कवळी आणि महाराष्ट्र गृहनिर्माण स्वयं/समूह पुनर्विकास प्राधिकरणाचे अध्यक्ष आमदार प्रविण दरेकर यांच्या पॅनेलने सर्वच्या सर्व २७ जागांवर विजय संपादित करत निर्विवाद वर्चस्व मिळवले आहे. महाराष्ट्र बॉक्सिंग असोसिएशनचे अध्यक्ष म्हणून आ. प्रविण दरेकर निवडून आले आहेत. मतदार प्रतिनिधीनी दाखवलेला विश्वास सार्थ करू व राज्यात बॉक्सिंगला पुन्हा वैभवाचे दिवस आणू असे आ. दरेकर यांनी विजयानंतर म्हटले. आज झालेल्या निवडणुकीत अध्यक्ष पदासाठी आ. प्रविण यशवंत दरेकर यांना ४३ तर विरोधी पॅनेलच्या रणजित सावरकर यांना ० मते मिळाली. ४३ मतांसह दरेकर हे विजयी झाले. अध्यक्ष पदी निवडून आल्यावर आमदार प्रविण दरेकर यांनी लगेच आजीव अध्यक्षपदी किशन नरसी व जय कवळी, कार्याध्यक्ष पदी विठ्ठलराव लोखंडकार यांची नियुक्ती केली.



महासचिव पदी पुणे जिल्ह्याचे भरतकुमार व्हावळ यांनी प्रतिस्पर्धी राकेश तिवारी यांच्या विरुद्ध ४३-० असा एकतर्फी विजय मिळवला. खजिनदार पदी नाशिकचे ॲड. मनोज पिंगळे बिनविरोध विजयी झाले. उपाध्यक्ष पदी पंकज भारसाकळे, मुन्ना कुरणे, मिलिंद साळुंखे, तुषार रंधे, अविनाश बागवे, संग्राम गावंडे, ॲड. गौतम चाबुकस्वार, गौरव चांडक, राजेश देसाई, ॲड. शेख अकबर, वैभव वनकर, संतोष आंबेकर, विक्रांत खेडकर, नील पाटील, कॅप्टन शाहूराज बिराजदार, विजय सोनवणे यांची तसेच, कार्यकारी सचिव पदी शैलेश ठाकूर, प्रशासकीय सचिव पदी महेश सकपाळ हे विजयी झाले, तर विभागीय सचिव म्हणून मयूर बोरसे, मंगेश कराळे, ॲड. संपत साळुंके, अरुण भोसले, विजयकुमार यादव, विजय गोटे हे या आधीच बिनविरोध निवडून आले आहेत. अध्यक्ष आमदार प्रविण दरेकर यांनी सह-कोषाध्यक्ष पदी एकनाथ चव्हाण, व रिक्त विभागीय सचिव पदी विमलेश सिंग आणि सौरभ मुनघाटे यांच्या नियुक्तीची घोषणा केलीआहे.

# नेहमीच तेच चेहरे, तेच घराणे! सामान्यांना पक्ष देणार का संधी?

## ही निवडणूक जनतेची होणार की घराणे शाहीची? कार्यकर्ते का फक्त सतरंज्या उचलायलाच का?

जनसंचलन/बुलढाणा

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका काही तोंडावर येऊन ठेपल्या आहेत आणि सगळ्या पक्षांनी मोर्चाबांधणीला सुरुवातही केली आहे. मात्र यात पुन्हा एकदा नेहमीचाच प्रश्न समोर आला आहे राजकारण म्हणजे काही मोजक्या घराण्यांचीच मक्तेदारी आहे का? नगराध्यक्ष, नगरसेवक,जिल्हा परिषद सदस्य अशा पदांवर निवडून येणाऱ्यांत बहुतांश वेळा तेच राजकीय वारसदार किंवा जुन्या नेत्यांचे नातेवाईक दिसतात.सामान्य जनतेच्या प्रभागातील,वार्डातील अडचणी सोडवणारा प्रतिनिधी कुठे आहे? कार्यकर्ते हे सगळे काय फक्त सतरंज्या उचलायला व मत देण्यासाठीच? कोणताही पक्ष असो उमेदवारीसाठी सर्वसामान्य माणसाची दारं कायम बंदच दिसतात.काही ठिकाणी तर मागे पडलेले, कामगिरीहीन नेते पुन्हा पुन्हा पुढे रेटले जातात. समाजकारणाच्या नावाखाली केवळ पैसाकारण सुरू असल्याचे स्पष्टपणे दिसते. सुज्ञ जनतेमध्ये आता संतापाची लाट आहे. विकासासाठी नव्या चेहऱ्यांची गरज आहे, जुन्या साच्यातून बाहेर पडण्याची वेळ आली आहे. राजकीय पक्षांनी जर यावेळी देखील पारंपरिक चेहऱ्यांनाच संधी दिली, तर मतदारही यावेळी गप्प बसणार नाहीत, ही काळ्या दगडावरची रेघ ठरेल! बुलडाणा शहरातील प्रत्येक प्रभाग व त्यातील वार्डात माजी नगरसेवकांनी कोणता निधी कुठे कसा खर्च केला ? वार्डासाठी रस्ते,नाल्या,लाईट,स्वच्छतावर किती निधी मिळविला तो कसा कुठे खर्च केला ? कागदोपत्री प्रभागाचा वार्डाचा विकास की भकास करून गिळून बसलेल्या माजी नगरसेवकांची पोलखोल पुढील प्रत्येक भागात










# दैनिक जनसंचलन सिटी न्यूज व हॅलो बुलढाणाच्या प्रकाशपर्व २०२५ या दिवाळी विशेष अंकाचे विमोचन सोहळा पाहुण्याच्या हस्ते..














दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८